इतिहास

भारतीय चित्रपट उद्योगाला सुरुवातीच्या दिवसांतच उच्च स्तराचं साहित्य आणि संगीताची देणगी लाभली, हे या क्षेत्राचं सुदैवच म्हणावं लागेल. लुडविग ब्रोंझचं एक प्रसिद्ध वचन आहे, प्रत्येक शिल्पकार त्याच्या शिल्पातं प्रच्छन्नपणे आपल्या व्यक्तिमत्त्वाची छवी निर्माण करत असतोच. द न्यू थिएटर्सच्या बाबतीत हे विधान शब्दशः लागू होतं.

१९३१ साली या कंपनीने शरदबाबूंच्या *देना पावना* या कादंबरीवर आधारित *देना पावना* नावाचा सिनेमा बनवला होता. शरदबाबूंनी या कथेसाठी अगदी नाममात्र मानधन घेतलं होतं. ह्या चित्रपटाची निर्मिती होत असताना ते द न्यू थिएटर्सच्या स्टुडियोला वरचेवर भेट देत असत आणि आवश्यक वाटेल तिथे सल्लाही देत असत. त्याच दिवसांत देवकी बोस, प्रथमेश बरुआ(पी. सी.बरुआ), आर.सी.बोराल. नितीन बोस यांच्यासारख्या प्रतिभावंतांनी या संस्थेत पदार्पण केलं होतं. तसं पाहायला गेलं तर पंकज मलिक आणि बोराल मूकपटाच्या काळापासूनच या संस्थेशी जोडलेले होते. पण ते त्याकाळी इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या रेडियोवर अधिक व्यग्र होते. द न्यू थिएटर्सच्या स्थापनेनंतर त्यांचं मन या क्षेत्रात अधिक रस घेऊ लागलं. प्रेमांकुर अटोर्थीसारखे समर्थ लेखक-नाटककरही या संस्थेशी *देना पावना*च्या दिग्दर्शनाच्या निमित्ताने आणि नितीन बोस कॅमेरामन म्हणून जोडले गेले.

डिसेंबर, १९३१मध्ये हा सिनेमा प्रदर्शित झाला. त्याच वेळी शरदबाबूंच्या 'पल्ली समाज' या कादंबरीवर आधारित बंगाली सिनेमाचं चित्रीकरणही बरोबरीने सुरू झालं होतं, पण तो काही कारणास्तव उशीराने प्रदर्शित झाला. यामागचं मुख्य कारण म्हणजे संपूर्ण भारतीय प्रेक्षकाचा विचार करून बी.एन. सरकार यांना हिंदी चित्रपटाच्या निर्मितीचे वेध लागले होते. आणि दुसरं कारण, बंगालमध्ये फक्त हिंदी चित्रपट दाखवण्याच्या आपल्या न्यू सिनेमा या चित्रपटगृहाच्या उद्घाटनात ते व्यग्र होते. हे उद्घाटन त्यांनी शरदबाबूंच्याच हस्ते करवलं होतं.

१९३२मध्ये स्टुडियोचं बांधकाम पूर्ण झालं. त्याकाळच्या रिवाजानुसार अनेक कलाकार आणि तंत्रज्ञांना करारतत्त्वावर तर काहींना मासिक पगारावर त्यांनी आपल्या संस्थेशी बांधून ठेवलं. सुबोध मित्रा, काननदेवी, कुंदनलाल सायगल, उमाशशी, पृथ्वीराज कपूरसारख्या नव्या दमाच्या अनेक कलाकारांचा त्यांच्यात समावेश होता. मोलीना, मेनका, चंद्रावती, रतनबाई, नवाब, जगदीश शेठी, कमलेशकुमारी, दुर्गादास बॅनर्जी, पहाडी सन्याल, अमर मलिक आणि युसूफ मुलजीसारखे अनुभवी कलाकारही या संस्थेत दाखल झाले. गंमत अशी की, बी.एन.सरकार यांच्या परीसस्पर्शाने नीतिन बोस, बिमल रॉय आणि फणी मजूमदार यांच्यासारखे कॅमेरामनही मागाहून कुशल दिग्दर्शक म्हणून नावारुपाला आले. त्यांचे जुने सहकारी पी. एन.रॉय स्वतः प्रॉडक्शन मॅनेजरसारख्या संचालकीय पदावरून थेट दिग्दर्शनाकडे वळले.

सुरुवातीपासूनच द न्यू थिएटर्सला चित्रपटाच्या अनेक बाजूंचं सखोल ज्ञान देणारी शाळा असंच स्वरूप आलं होतं. या परंपरेतल्या



के. एल. स

द न्यू थिएटर्सः प्रतिभावंतांची कार्यशाळा

***द** न्यू थिएटर्सची पार्श्वभूमी बंगाली होती, तरीही काही पंजाबी लोकांनी तिथे आपली खास ओळख निर्माण केली. कुंदनलाल सायगल त्यांच्यापैकीच एक.*

□ रजनीकुमार पंड्या

दुसऱ्या-तिसऱ्या पिढीत आपल्याला हृषिकेश मुखर्जी आणि गुलजार यांच्यासारखे प्रतिभावंत निर्माता-दिग्दर्शक मिळाले.

आज गुलजार यांच्यानंतर चित्रपटक्षेत्रात साहित्यिक दिसत नाही. स्वतः बी.एन. सरकार यांना साहित्य आणि संगीतात नुसतीच रुची होती असं नाही तर, त्याची जाणही होती. *देना पावना* या पहिल्या बंगाली सिनेमानंतर लगेचच त्यांनी गायक-अभिनेता कुंदनलाल सायगल आणि अख्तरीबाई यांना चमकावणारा *मोहब्बत के आंसू* नावाचा सिनेमा आपल्या न्यू सिनेमा नावाच्या चित्रपटगृहाबरोबरच संपूर्ण भारतात प्रदर्शित केला.

अर्थात, द न्यू थिएटर्सचा इतिहास बारकाईने तपासला तर त्यांचा पहिला चित्रपट होता *जोशे महोब्बत*. पण त्याची नेगेटिव्ह किंवा प्रिन्ट सापडत नाहीत. इतकंच नाही तर त्यातील कलाकार-तंत्रज्ञ यांच्याविषयीचेही तपशील उपलब्ध नाहीत. सरदार हरमंदिरसिंग हेमराज यांच्यासारख्या जाणत्या आणि अधिकृत हिंदी चित्रपट गीतकोशाच्या पहिल्या खंडात (१९३१-४०) या सिनेमाचं फक्त नाव द न्यू थिएटर्स बॅनर्सखाली नोंदलेलं दिसतं. मागाहून या सिनेमाचा काही तपशील मिळालाच तर त्यासाठी जागा ठेवण्यात आलीय. पण आजही ती जागा तशीच रिकामी आहे. *मोहब्बत के आंसू*मध्ये सायगल आणि अख्तरी मुरादाबादी, सादिक, अन्सारी आणि महत्त्वाचे तंत्रज्ञ यांच्यांबरोबरच संगीतकार म्हणून रायचंद बोराल आणि दिग्दर्शक म्हणून प्रेमांकूर अटोर्थी यांचं नाव आहे. यापेक्षा अधिक माहिती तपशील उपलब्ध नाही. तो कुंदनलाल सायगल यांचा पहिला सिनेमा होता, असा आवर्जुन उल्लेख केलेला सापडतो.


पृथ्वीराज कपूर

पहिला भारतीय स्टार कुंदनलाल सायगल

द न्यू थिएटर्सचं कल्चर बंगाली होतं, पण मागाहून या संस्थेशी जोडलेल्या पंजाबी लोकांनी पैशाच्या जोरावर इथे आपलं स्थान बळकट केलं. त्यात कुंदनलाल सायगल, पृथ्वीराज कपूर आणि विक्रम कपूर(संगीतकार अनिल बिश्वास यांच्या पत्नी मीना कपूरचे वडील) यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. त्यांच्यापैकी कुंदनलाल सायगल हे नाव द न्यू थिएटर्सशी खूप आधीपासून जोडलेलं होतं.

४ एप्रिल १९०४ रोजी काश्मीर राज्यातील जम्मूजवळच्या एका गावात कुंदनलाल यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचं नाव अमीरचंद आणि आईचं नाव केसरबाई होतं. काश्मीरचे महाराजा श्री प्रतापसिंग यांच्या दरबारी ज्युडिशल ऑफिसर म्हणून अमीरचंद काम करत होते.

त्यांचं मूळ गाव पंजाबमधील जालंधर शहर होतं. कुंदनलालना शिक्षणात विशेष गती नव्हती. तरीही वडिलांच्या हट्टामुळे त्यांनी जेमतेम मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेतलं. मग वडिलांनी त्यांना रेल्वेत कारकून म्हणून चिकटवलं. तिथे ते रमले नाहीत.

> ***आपल्या मुलाचं शिक्षणात लक्ष नाही ही गोष्ट जेव्हा जेव्हा वडिलांच्या मनाला खात असे, किंवा अन्य एखाद्या कारणाने ते मुलावर रागवत, तेव्हा त्याला बदडत. त्यावेळी त्यांची आई आपल्या मधुर आवाजात भजनं म्हणून मुलाला शांत करत असे.***

एका हॉटेलमध्ये मॅनेजरची नोकरी, टाइपरायटर दुरुस्तीची माहिती असल्याने रेमिंग्टन रॅन्डसारख्या प्रसिद्ध कंपनीत मेकॅनिक आणि नंतर सेल्समन म्हणूनही सायगल यांनी नोकरी केली. त्या ठिकाणी त्यांच्यावर चोरीचा खोटा आळ घालण्यात आला आणि तीही नोकरी सुटली. कोणत्याच नोकरीत त्यांचं मन रमत नव्हतं. यामागचं खरं कारण होतं, सायगलना असलेली संगीतातली रूची. संगीतातली ही आवड निर्माण होण्यामागे आई-वडीलच कारणीभूत होते.

आपल्या मुलाचं शिक्षणात लक्ष नाही ही गोष्ट जेव्हा जेव्हा वडिलांच्या



काननदेवी

मनाला खात असे, किंवा अन्य एखाद्या कारणाने ते मुलावर रागवत, तेव्हा त्याला बदडत. त्यावेळी त्यांची आई आपल्या मधुर आवाजात भजनं म्हणून मुलाला शांत करत असे. आईच्या आवाजात मुलाविषयीची ममता, त्याला मार खावा लागत असल्याने होणारी पीडा कुंदनलालच्या मनाला स्पर्शून जाई. ही वेदनाच त्यांना संगीताच्या जवळ घेऊन जात असे. आठ-नऊ वर्षांचे असताना त्यांचा आवाज मुलींसारखा होता. त्यावेळी ते गावातल्या *रामलीला*मध्ये सीतेचं पात्र साकारायचे. सीतेच्या त्या स्त्री भूमिकेशी ते एकरूप होऊन जात असत.

'स्वरयात्रा' नावाच्या पुस्तकात राघव मेनन यांनी सायगलांच्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत. सुनील रैनी नावाचा नट रावणाची भूमिका करायचा. रावण सीतेचं हरण करून तिला घेऊन जात असतो, तेव्हा रामाच्या विरहाने व्याकूळ सीता जो विलाप करते, तो गाण्यातून व्यक्त करायचा असे.

कुंदनलालना ते दृश्य करणं खूप आवडायचं. कदाचित त्यावेळी त्यांच्या गाण्यातून त्यांची स्वतःची वेदना डोकवत असावी. त्या दृश्यात भावविभोर होऊन कुंदनलाल असा काही आक्रोश करत की, तो ऐकून घाबरलेला रावण त्यांना तिथेच सोडून जाईल असं बघणाऱ्यांना वाटे. प्रेक्षकांच्या अंगावर काटा उभा राही. (अनेकदा पहिल्या रांगेतल्या प्रेक्षकांत त्यांचे वडीलही असायचे) दर वर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या या रामलीलेची कुंदनलाल वर्षभर आतुरतेने वाट बघत असायचे.

त्यांचा कंठ फुटेपर्यंत त्यांनी ही भूमिका साकारली. दरम्यान त्यांच्या गायनावर सलमान युसूफ नावाच्या एका सूफी संताच्या गायकीचेही संस्कार होत होते. सलमान युसूफ येझवी संप्रदायातील प्रसिद्ध सूफी संत सिराजुद्दीन यांचे वारस होते. एकदा केसरबाई आपल्या मुलाला या सूफी संताकडे आशिर्वाद घ्यायला घेऊन गेल्या होत्या. तेव्हापासून कुंदनलाल त्यांच्या भजनी लागले होते.

असो. कुंदनलालविषयी फार तपशीलात लिहायचं ठरवलं तर एक स्वतंत्र लेखमालाच तयार होईल. आपण इथे बोलतोय ते द न्यू थिएटर्समधल्या त्यांच्या प्रवेशाबद्दल. तर तो काही प्रयत्नपूर्वक झालेला नव्हता, असंच म्हणावं लागेल. रेमिंग्टन रॅन्ड टाइपरायटर कंपनीचे एक सहकारी माणकतला यांच्याबरोबर कोलकात्यातली ही नोकरी टिकवण्यासाठी धडपडत होते. अनेकांनी कुंदनलाल भविष्यात फार मोठी कीर्ती मिळवतील असंही भाकीत केलं होतं. पण स्वतः कुंदनलाल अगदी निराश आणि दिशाहीन झाले होते.

अनेक वर्षांपूर्वी म्हणजे १९५४मध्ये न्यू थिएटर्स बंद झाल्यानंतर १९५५मध्ये आपल्या या मित्राला श्रद्धांजली देण्यासाठी म्हणून बी. एन. सरकार यांनी *अमर सायगल* नावाचा चित्रपट सरकार प्रॉडक्शनच्या बॅनरखाली बनवला होता. त्यात हे तपशील आढळतात. नितीन बोसनी याचं दिग्दर्शन केलं होतं. जी मुघेरी नावाच्या एका नॉन फिल्मी कलाकाराने यात सायगलांची भूमिका केली होती. त्यांचा चेहरा सायगलांशी खूप मिळता जुळता होता. त्यातलं एक दृश्य मला अजूनही आठवतंय. नळाच्या संततधारेतून पडणाऱ्या पाण्याच्या आवाजातही सायगलांना संगीत सापडत असे, अशा अर्थाचं ते दृश्य होतं.

असो. मागाहून द न्यू थिएटर्ससाठी आधारस्तंभ बनलेल्या कुंदनलाल सायगल यांचं द न्यू थिएटर्समध्ये पदार्पण ही एक ऐतिहासिक घटना होती हे नक्की.

(क्रमशः)

"**कुंदनलालना ते दृश्य करणं खूप आवडायचं. कदाचित त्यावेळी त्यांच्या गाण्यातून त्यांची स्वतःची वेदना डोकवत असावी. त्या दृश्यात भावविभोर होऊन कुंदनलाल असा काही आक्रोश करत की, तो ऐकून घाबरलेला रावण त्यांना तिथेच सोडून जाईल असं बघणाऱ्यांना वाटे. प्रेक्षकांच्या अंगावर काटा उभा राही.**"